• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८४ • शनिवार,दि.१३ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 284 • Saturday 13 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# कितीही राजकीय शक्ती वापरा, मराठे मुंबईत दिसणार-जरांगे पाटील

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

आम्ही सरकारच्या आशेवर नाही. पोरांचे नुकसान व्हायला लागलंय मग आणखी किती दिवस वेळ द्यायचा? आता मराठ्यांनी ठरवलंय घराघरातून मराठे मुंबईत येणार आहे. आमची तयारी सुरू आहे. जे मुंबईत येणार नाही ते जिथे असतील तिथून आंदोलनात उतरणार आहे. सरकार गुप्तपणे आकडेवारी काढतंय पण तुमचे गणित कोलमडून जाणार आहे. मुंबईत ३ कोटी मराठा दिसतील. पुण्याच्या पुढे गेले आणि पनवेलजवळ पाहिले तर ३ कोटीला कमी पडले तर नाव बदलून ठेवा असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे.




मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मुंबईत जायची वेळ येणार आहे. त्यामुळे मराठे कामाला लागले आहेत. दारोदारी जाऊन समाजाला जागरुक करत आहोत. लाखोंच्या संख्येने मराठा समाज सहभागी होणार आहे. काही मुंबईत येतील काही रस्त्यावर निरोप द्यायला येतील. प्रत्येकाला लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे. ओबीसी नेते जितक्या सभा घेतात तितका आमचा समाज आणखी एक होतोय. सुप्रीम कोर्टातील आरक्षण टिकणार आहे का हा मुद्दा आहे. सातारच्या गादीला मी प्रचंड मानतो. त्याबद्दल एक शब्दही काढणार नाही. ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण झाले तर टिकत नाही हे आधी पाहिलेले आहे असं त्यांनी सांगितले. तसेच मुंबईला जाण्याचा मार्ग ठरवला आहे. आजही बैठक झाली. कुठे कुठे मुक्काम करायचा, तिथे सगळ्या गोष्टींची व्यवस्था आहे की नाही याचा आढावा घेतला जातोय. १५ तारखेला पत्रकार परिषद घेऊन कुठे कुठे मुक्काम असेल हे जाहीर करू. आम्ही मुंबईला जाण्याच्या तयारीत आहोत. किती दिवस संयम पाळायचा, गोरगरिब मराठा लेकरांसाठी ७ महिने वेळ दिला. तुम्ही जाणुनबुजून करताय हे वाटायला लागलंय. त्यामुळे आज-उद्या करण्यात पोरांचे वाटोळे होतंय, समाजाची पोरं मोठी व्हायला पाहिजे हे आम्ही ठाम ठरवलंय त्यामुळे आमचे मुंबईला जायचंय हे फिक्स आहे असंही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. दरम्यान, आमच्या नोंदी सापडलेल्या असतानाही कायदा पारित होत नाही. बैठका होत राहतात मात्र त्यातून काही होत नाही. २० जानेवारी रोजी मुंबईला निघण्याची तयारी झालेली आहे . तयारी अंतिम टप्प्यात आहे. आरक्षण घेतल्याशिवाय आता माघार नाही. किती लोक येणार आहे याचा शोध घेण्यासाठी सरकारी यंत्रणाही कामाला लागली आहे असे जरांगे म्हणाले.

## पूजा सारडाचे सीए परीक्षेत यश

**माजलगाव । प्रतिनिधी**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या वतीने घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत येथील पूजा जगन्नाथ सारडा हिने यश संपादन केले. येथील शेतकरी जगनाथ सारडा यांची पूजा ही तृतीय कन्या यापूर्वी मोठी मुलगी पण सीए असून मुलगा इंजिनियर आहे.पूजा चे माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात झाले आहे. पुणे येथे राहून तिने या परीक्षेची तयारी केली. तिच्या या यशा बद्दल माहेश्वरी सभेचे अध्यक्ष उमेशकुमार जेथलिया, अ भा सदस्य राधेश्यामलोहिया, गोविंद बजाज,प्रदेश सदस्य संतोष जेथलिया, लड्डा, नवलकीशोर काबरा, विवेक बजाज,सचिव गोपाल मानधने, लोहिया, मानधने, लक्ष्मीकांत मानधने,प्रा कमलकिशोर लड्डा, विकास मालानी, प्रा. पवन गिलडा, मुख्याध्यापक करवा,मालपाणी यांनी सत्कार करून अभिनंदन केले.





## जिजाऊंना अभिवादन

बीड : राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना बीड विधानसभा मतदार संघाचे आ.संदीपभैय्या क्षीरसागर इत्यादी.

## राष्ट्रमाता जिजाऊ यांना सिंदखेडराजा येथे अभिवादन

**जालना । वृत्तसंस्था**

स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या ४२६ व्या जन्मोत्सवानिमित्त येथील राजे लखुजीराव जाधव यांच्या राजवाड्यात जिजाऊंच्या जन्मस्थळी असलेल्या प्रतिमेची शुक्रवारी पहाटे अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून महापूजा केली. सकाळचे आल्हाददायक वातावरण, सनईचे मंजूळ सूर आणि फटाक्यांच्या आतषबाजीने राजवाड्यातील वातावरण चैतन्यमय झाले होते. माँसाहेब जिजाऊ यांना अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून हजारो शिवप्रेमींनी सिंदखेडराजात हजेरी लावली.. मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व सेवा संघाच्या विविध शाखांच्या वतीने १६ जोडप्यांकडून जिजाऊ माँसाहेब यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी जिजाऊ वंदना घेण्यात आली. जिल्हा समन्वयक सुभाष कोल्हे, अ‍ॅड. राजेंद्र ठोसरे, शिवाजी जाधव, ज्योती जाधव यांच्यासह विविध पदाधिकारी या वेळी उपस्थित



▶▶ पुढील पानावर

## मावेजा न दिल्याने उपविभागीय अधिकाऱ्यांची गाडी जप्त


**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील आंबेवडगाव येथील रहिवासी असलेल्या नागरिकाला तलावात घर गेलेले असताना व त्याचा २५ वर्षापासून मावेजा न दिल्यामुळे येथील उपविभागीय अधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश माजलगाव न्यायालयाने शुक्रवारी दिले आहेत. धारूर तालुक्यातील आंबेवडगाव येथील रहिवासी असलेले यशवंत केरबा घोळवे (वय ८०) यांचे घर उपळी तलावात गेले होते. यामध्ये संबंधित व्यक्तीस शासनाकडून कमी मावेजा मिळाल्यामुळे त्यांनी १९९९ साली माजलगाव न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर न्यायालयाने अनेकवेळा संबंधित व्यक्तीस २ लाख ६० रूपये मावेजा देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अनेक उपविभागीय अधिकारी बदलले व न्यायालयाने संबंधित व्यक्तीस मावेजा न दिल्यामुळे येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर एस.डी. घनवट यांनी ३ जानेवारी रोजी विभागीय अधिकारी यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले ▶▶ पुढील पानावर

## बीडमध्ये जाळपोळ करणाऱ्या गुंडाची हर्सूल कारागृहात रवानगी

**बीड । वृत्तसंस्था**

बीड शहरासह तालुक्यात दहशत माजविणाऱ्या गुंडावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्याची हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. याच गुंडाचा मराठा आरक्षणातील जाळपोळीतही सहभाग असल्याचे उघड झाले आहे. त्याच्यावर दंगा करण्यासह इतर गंभीर स्वरूपाचे सह गुन्हे दाखल आहेत. हाच धागा पकडून पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी गुरूवारी ही कारवाई केली. समधान बाबुराव खिंडकर (वय २८ रा.बेलवाडी ता.जि.बीड) असे या गुंडाचे नाव आहे.



या गुंडाविरोधात खूनाचा प्रयत्न करणे, जाळपोळ करणे, दंगा करणे, सरकारी नौकरावर हल्ला करणे, दरोड्याची तयारी करणे, अवैध शस्त्र बाळगणे, मालमत्तेचे नुकसान करणे, जिवे मारण्याची धमकी देणे, शिवीगाळ करणे, दरोडा टाकणे, गैर कायद्याची मंडळी जमवणे, रस्ता अडवणे, घराविषयी आगळीक करणे, सरकारी कर्मचाऱ्यांना दुखापत करणे असे गंभीर स्वरूपाचे सहा गुन्हे दाखल आहेत. याची बीड शहरासह तालुक्यात दहशत होती. हाच धागा पकडून पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक कैलास भारती यांनी त्याचा एमपीडीए प्रस्ताव तयार करून पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्फत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्याकडे पाठविले. मुधोळ यांनी मान्यता देताच त्याला पिंपळनेर परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. त्यानंतर त्याची छत्रपती संभाजीनगरच्या हर्सूल कारागृहात रवानगी करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अपर अधीक्षक सचिन पांडकर, उपअधीक्षक ▶▶ पुढील पानावर

## भाजपाचे राजकारण धर्माच्या आधारावर


**मुंबई । वृत्तसंस्था**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुराज्य स्थापन केले तर संत महंतांनी अध्यात्माचे कार्य केले. शिवाजी महाराजांनी राजकारणात धर्म आणला नाही.



छत्रपतींच्या सुराज्यात शेतकऱ्याच्या भाजीच्या देटालाही हात लावू नका अशी शिकवण होती पण आज भाजपाच्या राज्यात शेतकरी दररोज मरत आहे आणि सत्ताधाऱ्यांना त्याचे काहीच देणेघेणे नाही. अनेक पक्षांची सरकारे आली व गेली पण त्यांनी राजकारणासाठी धर्माचा वापर केला नाही परंतु भारतीय जनता पक्ष धर्माचा वापर आपल्या राजकारणासाठी करत आहे, असा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रदेश काँग्रेसचे कार्यालय टिळक भवन येथे सेल व विभागाच्या महिलांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, ▶▶ पुढील पानावर

## शांताई अर्बनमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचा ध्यास ज्याच्या ध्यानीमनी स्वप्नांनी होता त्या थोर माऊली जिजाऊ यांची जयंती शांताई अर्बन मध्ये विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली बीड येथील सीए क्षेत्रातील नामांकित ज्ञानेश्वर खाडे सर तसेच जिजाऊंच्या प्रतिमेस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. उपस्थित सर्व मान्यवरांनी आदर व्यक्त करून हिंदवी स्वराज्याची केली गेल्याने असे मत खाडे सर यांनी व्यक्त केले यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर डी बी शिंदे व शांताई अर्बनचे उपाध्यक्ष संदीप वाघमारे यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे कुलकर्णी, नाटकर, इत्यादी सर्व उपस्थित होते.

# मराठा आंदोलनाविरोधात दाखल जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली

**मुंबई । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाचा चेहरा ठरलेल्या मनोज जरांगे पाटलांच्या मुंबईतील आंदोलनाविरोधात दाखल झालेली एक जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळून लावली. आम्ही येथे कायदा - सुव्यवस्था राखण्यासाठी बसलो नाही, असे खडेबोल यावेळई न्यायालयाने यावेळी ही याचिका दाखल करणाऱ्या याचिकाकर्त्याला सुनावले. हेमंत पाटील नामक व्यक्तीने मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानावरील आंदोलनाविरोधात हायकोर्टात याचिका दाखल केली होती. मराठा व ओबीसी या दोन्ही समुदायांनी आझाद मैदानावर आंदोलन करण्याची परवानगी मागितली आहे. याच दिवसापासून या समाजांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यामुळे कायदा सुव्यवस्थेची भीती निर्माण होण्याची भीती असल्याने जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाला परवानगी देण्यात येऊ नये, अशी मागणी पाटील यांनी आपल्या याचिकेद्वारे केली होती. पण उच्च न्यायालयाने त्यांची याचिका दाखल करून घेण्यास नकार दिला. आम्ही त्यांना कसे रोखणार ? हे आमचे काम नाही. न्यायालय येथे कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी बसले नाही. आम्हाला याहून महत्त्वाची कामे आहेत, असे




खडेबोल यावेळी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने याचिका फेटाळताना याचिकाकर्त्याला सुनावले. दुसरीकडे, मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर अवघ्या राज्याचे रान पेटवले आहे. मराठा समाज मुंबईत आल्यानंतर आरक्षण घेऊनच राज्याची राजधानी सोडेल अन्यथा नाही, असा निर्वाणीचा इशारा त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारला दिला आहे. यामुळे सरकारपुढे बाका प्रसंग उभा राहिला आहे. मराठा समाजाच्या मुंबई आंदोलनाचा मार्ग ठरला:मनोज जरांगे लाखो बांधवांसह आंतरवाली सराटीहून नगर - पुणेमार्गे मुंबईला धडकणार मराठा आरक्षण आंदोलनाचा चेहरा ठरलेल्या मनोज जरांगे पाटलांनी आपल्या मुंबईला जाण्याच्या मार्गाची घोषणा केली आहे. मराठा समाजाची पायी दिंडी २० जानेवारी रोजी सकाळी ९ वा. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघेल. त्यानंतर ती मजल दरमजल करत अहमदनगर - पुणेमार्गे मुंबईला पोहोचेल, असे ते म्हणालेत. मनोज जरांगे मराठा आरक्षणाच्या प्रमुख मागणीसह मुंबईतील आझाद मैदानावर २० जानेवारीपासून आमरण उपोषण करणार आहेत. ▶▶ पुढील पानावर

संपादकीय

# शेतीकडे वाढता कल

भारत सरकारने देशभरात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी नैसर्गिक कृषी पद्धत म्हणजेच 'बीपीकेपी'ला प्राधान्य देत राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनची सुरुवात केली. कृषी क्षेत्रात वाढत्या रासायनिक खते आणि औषधांच्या वापरामुळे पिकांवर आणि त्याचा थेट परिणाम आरोग्यावर होत आहे. नैसर्गिक शेती ही एक रासायनिक खत मुक्त म्हणजेच पारंपरिक कृषी पद्धत आहे आणि त्यात वातावरणानुसार, परिस्थितीनुसार विविध कृषी प्रणालीचा विचार केला जातो. यात जैवविविधतेसह पीकपाणी, झाडी आणि पशुधन याचा समावेश असतो. शेतकरी शेतात कमी प्रमाणात रासायनिक खतांचा वापर करतील यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन सुरू केले आहे. राष्ट्रीय नैसर्गिक शेती धोरणानुसार पंधरा हजार क्लस्टर विकसित करून साडेसात लाख हेक्टरला या कार्यक्षेत्रात आणता येऊ शकते. नैसर्गिक शेती सुरू करण्याची इच्छा बाळगून असणार्या शेतकर्यांना क्लस्टर सदस्य रुपातून नोंदले जाईल आणि प्रत्येक क्लस्टरमध्ये ५० हेक्टर जमिनीसह ५० किंवा त्यापेक्षा अधिक शेतकर्यांना सामील करून घेतले जाईल. क्लस्टर हे एक गावसुद्धा असू शकते आणि त्यात परिसरातील दोन तीन गावांचा देखील समावेश होऊ शकतो. या मोहिमेनुसार पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी तीन वर्षांपर्यंत दरवर्षी पंधरा हजार रुपये प्रति हेक्टरचे अर्थसाह्य देखील केले जाईल. अशा प्रकारचे अर्थसाह्य करताना शेतकरी नैसर्गिक शेती करेल, याकडे विशेष लक्ष दिले जाईल. एखादा शेतकरी नैसर्गिक शेतीचा वापर करत नसेल तर त्याला उर्वरित हप्ते दिले जाणार नाहीत. याशिवाय नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी पायाभूत रचना, स्त्रोत, अंमलबजावणीतील प्रगती, शेतकरी नोंदणी, ब्लॉग आदींची माहिती प्रदान करणारे वेब पोर्टल तयार करण्यात आले आहे. देशात बिगर रासायनिक शेतीला प्रोत्साहित करण्यासाठी खरेदीवर भर दिला जात आहे. मात्र प्रत्यक्षात सर्व प्रयत्न अजूनही अर्धवट आहेत. सरकारने २०२२ पर्यंत शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे ध्येय ठेवले होते. परंतु त्यात ङ्गारसे यश आलेले नाही. उत्पादन आणि योंग्य भाव यातील अनिश्चिततेमुळे शेतकरी हा उच्च प्रमाणातील खर्चाच्या दुष्टचक्रात अडकला आहे. घसरणारे उत्पादन आणि पिकांवर रोगराई यामुळे कृषी क्षेत्र हे अडचणीकडे वाटचाल करत आहे. नैसर्गिक शेती हे एक अनोखे मॉडेल आहे आणि ते परिस्थितीवर अवलंबून आहे. त्याचा उद्देश उत्पादनाचा खर्च कमी करणे आणि सातत्यपूर्ण शेतीला प्रोत्साहन देणे आहे. नैसर्गिक शेती ही मातीवर असलेल्या सुक्ष्म जीव आणि कार्बनिक पदार्थांचे विखंडन करते आणि मातीला पोषकतत्त्वाला जोडण्याचे काम करते. अर्थात, सेंद्रीय शेतीत सेंद्रिय खते, कंपोस्ट खतांचा वापर केला जातो. त्याचे मिश्रण करत शेतात त्याचा प्रयोग केला जातो. भारत सरकारकडून नैसर्गिक शेतीपोटी मदत मिळवणारे कृषी क्षेत्र आता ४.०९ लाख हेक्टरवर पोचले आहे. या कामासाठी आंध्रप्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि केरळसह आठ राज्यांना ४९.८१ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यानुसार नैसर्गिक शेतीचा एक गट तसेच या गटातील शेतकर्यांची चळवळ उभी राहत असून ती भारतातील विविध राज्यांत पसरत आहे. शून्य बजेट नैसर्गिक शेती ही कमी खर्चाची आणि पर्यावरणपूरक आहे. यात शेतकर्यांना कृत्रिम खते आणि किटकनाशकांचा वापर करण्यापासून रोखण्यात येते. याप्रमाणे मातीची गुणवत्ता आणि मानवी आरोग्य सुरक्षित राहते आणि संभाव्य आजार आणि नुकसानीपासून बचाव होतो. शून्य बजेट नैसर्गिक शेती ही एकप्रकारची वैशिष्ट्येपूर्ण शेती आहे. त्यात बाजारातून बियाणे, खते आणि रोपट्यांचे संरक्षण करणारे पदार्थ, रासायनिक पदार्थ यासारखी महागडी उत्पादने खरेदी करण्यासाठी कोणतीही गुंतवणुकीची गरज नसते. ही एकप्रकारे व्यापक, नैसर्गिक आणि अध्यात्मिक कृषी प्रणाली आहे. शून्य बजेट नैसर्गिक शेती ही विविध प्रकारच्या कृषी तत्त्वांच्या माध्यमातून मातीच्या उत्पादन क्षमतेत सुधारणा करण्याचा परिणामकारक मार्ग आहे. नैसर्गिक शेतीचे अनेक ङ्गायदे आहेत जसे की मातीची उत्पादकता वाढवणे आणि पर्यावरणपूरक आरोग्य बहाल करणे, ग्रीन हाउस गॅस उत्सर्जनचे दमन करणे किंवा प्रमाण कमी करताना उत्पन्नवाढीसाठी मजबूत आधार मिळतो. ही एक नैसर्गिक आणि परिस्थितीजन्य प्रक्रिया असून ती शेतीत किंवा परिसरातच उपलब्ध असते. शून्य बजेट नैसर्गिक शेतीनुसार घेण्यात येणारे पीक देखील चांगले राहते आणि उत्पन्नही वाढते. 'भारतात सेंद्रिय शेतीपासून मिळणार्या लाभाचे पुरावे' नावाच्या अहवालात नैसर्गिक शेतीचा दृष्टिकोन अणि ङ्गायद्यांची माहिती पुराव्यासह दिली आहे. या आधारावर बिगर रासायनिक शेतीचा व्यापक विस्तार करता येऊ शकतो आणि या तथ्याकडे शास्त्रीय समुदाय अणि धोरणकर्ते लक्ष देतील, अशी अपेक्षा आहे. ते भविष्यात बिगर रासायनिक शेतीला प्रोत्साहित करतील. २०१४-१९ या काळात ५०४ वेळा नोंदलेले परिणाम सांगतात, की नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून उच्च प्रतीचे उत्पादन ४१ टक्के, रासायनिक पदार्थाच्या आधारित एकीकृत शेतीतील उत्पन्न ३३ टक्के तसेच रासायनिक शेतीतील उत्पन्न हे ३३ टक्के राहिले आहे. म्हणून नैसर्गिक शेतीकडे वाढता कल दिसून येत आहे.

## पासपोर्ट हरवला

नाव - रेवननाथ विनायक मुटकुळे, पत्ता - मु. पो. मांडवा ता. आष्टी, जि. बीड या नावाचा पासपोर्ट, पासपोर्ट नंबर -पी ३१४९८३१
दि. ०९/०१/२०२४ मंगळवार रोजी मांडवा ते आष्टी रिक्षा प्रवासा दरम्यान हरवला आहे. तरी कोणास आढल्यास कृपया ९५४५२४४८४२ या मो.नं.वर संपर्क करावा.

# इंडिया आघाडीची उद्या महत्त्वाची बैठक; भाजपाविरोधात एकजूट

**नागपूर । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाविरोधात एकजूट झालेल्या इंडिया आघाडीची शनिवारी (१३ जानेवारी) सकाळी ११.३० वाजता बैठक होणार आहे. सूत्रांनी सांगितले की, इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या या ऑनलाइन बैठकीत बिहारचे मुख्यमंत्री आणि जेडीयू अध्यक्ष नितीश कुमार यांना संयोजक बनवले जाऊ शकते. तसेच काँग्रेसचे प्रमुख मल्लिकार्जुन खर्गे यांना इंडिया आघाडीचे अध्यक्ष बनवले जाऊ शकते. सूत्रांनी सांगितले की, इंडिया आघाडीमध्ये समाविष्ट असलेल्या बहुतांश पक्षांनी नितीश कुमार यांना संयोजक बनविण्यावर एकमत केले आहे, परंतु पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) प्रमुख ममता बॅनर्जी यांनी याबाबत काहीही सांगितलेले नाही. इंडिया आघाडीची शनिवारी होणारी बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात



आहे. कारण इंडिया आघाडीला जागावाटप अंतिम करायचे आहे. तर काँग्रेसची राष्ट्रीय आघाडी समिती दररोज राज्यनिहाय जागावाटपावर चर्चा करत आहे. आत्तापर्यंत काँग्रेस आघाडी समितीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची आम आदमी पार्टी, यासह आरजेडी आणि समाजवादी पक्ष यांच्यासोबत जागावाटपाबाबत बैठका घेतल्या आहेत. मात्र, अद्याप टीएमसीसोबत कोणतीही चर्चा झालेली नाही. सूत्रांनी काल ( दि.११) सांगितले की, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या टीएमसीने काँग्रेसला लोकसभेच्या ४२ जागांपैकी २ जागांची ऑफर दिली आहे. फक्त दोन जागा असल्यामुळे टीएमसीची या ऑफरसाठी तयार नसल्याचे काँग्रेसने म्हटले होते. दरम्यान, टीएमसीशी संबंधित सूत्रांनी शुक्रवारी सांगितले की, टीएमसी बंगालमध्ये काँग्रेसला ३ जागा देण्यास तयार आहे, परंतु त्यासाठी टीएमसीला आसाममध्ये दोन आणि मेघालयमध्ये एक जागा द्यावी लागेल.

# वंचितच्या नेतृत्वात एकत्र येण्याची आवश्यकता

**बीड । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत:सह अस्पृश्यांची दु:खे पाहिली, अनुभवली म्हणून २५ डिसेंबर १९२७ ला विषमतेवर आधारलेल्या मनुस्मृतीचे महाड येथे जाहीर दहन केले व गुलामाला गुलामीची जाणीव करुन दिल्याशिवाय तो बंड करुन उठणार नाही. असा संदेश देवून 'शिका, संघटीत व्हावा आणि अन्यायाच्या विरोधात संघर्ष करा' असा मुलमंत्र एससी, एसटी, ओबीसी आणि अल्पसंख्यांकाना दिला. देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असतांना देशाची राज्यघटना लिहिण्यासाठी डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घटना समितीत प्रवेश मिळू नये म्हणून काँग्रेसने प्रचंड विरोध केला. सरदार वल्लभभाई पटेल हे म्हणाले होते की, मी आंबेडकरांना घटनेचे दरवाजेच काय खिडक्यासुध्दा बंद केल्या आहेत. परंतु मुस्लिम लीग पक्षाच्या सहकार्याने आणि शेडच्युल्ड कास्ट फेडरेशनचे जोगेंद्र प्रसाद मंडल यांच्या मदतीने बाबासाहेब घटना समितीत आले. परंतु ज्या भागातून बाबासाहेब निवडून आले होते. तो भाग भारत-पाकीस्तान फाळणीत पाकीस्तानात गेल्यामुळे बाबासाहेबांचे सदस्यत्व आपोपाच कमी झाले. परंतु घटना लिहिण्या लायक देशात इतर कोणी नसल्यामुळे शेवटी काँग्रेसलाच त्यांच्याच पक्षाच्या बॅरिस्टर जयकरांना मुंबईतून राजीनामा द्यायला लावून तेथून बाबासाहेब आंबेडकरांना परिषदेत घ्यावे लागले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी गांभिर्याने विचार करुन संपूर्ण बुध्द तत्त्वज्ञानावर आधारीत भारतीय संविधान देशाला देवून अनेक बुध्द प्रतिके दिली. अशोक स्तंभ तिरंगा ध्वजासह सम्राट अशोक चक्र, सत्यमेव जयते या प्रतिकांना अनुसरुन एवढ्या मोठ्या खंडप्राय देशातील धर्म, जात, पंथ, लिंग या सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य बहाल करुन निधर्मी राज्यघटना तयार केली. एक व्यक्ती एक मत, एक मूल्य या सर्वांना एका रेषेत आणले आणि संविधान बहाल करतांना इशारा दिला होता की, मी एवढ्या मोठ्या परिकष्टाने तयार केलेली ही लोकशाही राज्यघटना चालवणारे जर नालायक निघाले तर ही घटना कुचकामी ठरेल.

नेमकी तीच परिस्थिती देश आणि देशातील जनता २०१४ पासून अनुभवत आहे. विचारवंतांना संपवण्यात येत असून देशाचे संरक्षण करणारे करकरे सारखे अनेकांना संपविले जात आहे. जरी त्यांना दिवसा ढवळ्या जाळले जात आहे. मागासवर्गीय अल्पसंख्यांकांच्या स्त्रीयांवर दिवसा ढवळ्या नागवे करुन बलात्कार केला जातो आणि बलात्कारीतांचे स्वागत केले जाते. बिल्कीस बानो प्रकरण पाहिले. मनीपूर जळत असतांना पाहिले. आज पर्यंत असा संवेदनाहिन पक्ष आणि पक्षाचे नेते आरएसएस, भाजप सारखे, जातीभेद-जातीद्वेष करणारे जनतेने पाहिले नाहीत. बॉम्बस्फोटातील दोषींना शिक्षा करण्या ऐवजी आरोपी, खूनी, भ्रष्टाचार्यांना, आमदार, खासदार मंत्री करण्यात येते ही गंभीर परिस्थिती आहे. 'अशी अवस्था सध्या देशामध्ये आहे. खरंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामार्फत दिलेल्या आरक्षणाचे अधिकाराने विविध एससी, एस.टी.ओबीसी, अल्पसंख्यांकांचे विविध पक्षाच्या नेते मंडळींपर्यंत पदाधिकार्यांसमोर गोंडा घोळणारे सवलती धारक, आमदार, खासदार, मंत्री संसदेत, विधानसभा, विधान परिषदेत आवाज उठवू शकत नाहीत, किंवा अन्याय अत्याचार प्रकरणातील विरोधात हिम्मत करत नाहीत. देशाचे राष्ट्रपतीसुध्दा परिस्थिती समोर हातबल असल्याचे आपण पहात आहोत. देशातील संपूर्ण संस्था या सरकारच्या आदेशानुसार वर्तन करत आहेत. एवढेच काय न्यायालयाने सुध्दा त्यांच्या मताने निर्णय देण्यावर बंधने घातली जात आहेत. फक्त सुप्रिम कोर्टाचे जज मा.चंद्रचुड साहेब हे घटनेनुसार न्याय देत आहेत. आज महाराष्ट्राचा विचार केला तर उपमुख्यमंत्री महाराष्ट्रातील नसून गुजरातचे असल्यासारखे वागतात. कितीही मोठे-मोठे प्रकल्प महाराष्ट्रातून गुजरातला पळवले जात आहेत आणि महाराष्ट्रातील राजकारणी नेते मुग गिळून गप्प आहेत, ते तरी काय करणार बिचारे. त्यांना ईडीचा दंडुका पाठीमागे लवल्याने तेही शेपूट घालून गप्प आहेत. अस्थित्वहिन एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्याक नेते तोंड बंद करुन डोळ्यावर, कानावर पट्ट्या बांधून गप्प आहेत. म्हणून देशाची आर्थिक नाडी असणारी मुंबई आणि महाराष्ट्र आता अस्तित्वहिन होत आहे. शिक्षण, रोजगार, महागाईमुळे जनता मेटाकुटीला आली असून उपासमारी मोठया प्रमाणात होत असल्याचे दिसून येत आहे. नुसते महाएल्गार मेळावे भरवून प्रश्न सुटणार नाहीत, ही परिस्थिती बदलायची असेल तर नुसती चर्चा, मोर्चे, आंदोलने, मेळावे सभा भरवून चालणार नाही. त्या करीता सर्वच समाजातील विविध पक्षाच्या नेत्यांनी अगोदर झेंडे बाजुला ठेवावे लागतील. नेत्यांना सोडून द्यावे लागेल. कृती आराखडा तयार करावे लागेल. एकत्र येवून ईव्हीएम विरोधात प्रचंड उठाव करावा लागेल. प्रत्येक निवडणूक ही बॅलेट पेपरवरच घेण्याकरीता निवडणूक आयोगावर दबाव आणावा लागेल आणि या सर्व प्रकाराकरीता कोणत्याही समाजाकडे असा कणखर, खंबीर, निर्भिड, प्रचंड बुध्दीवान, ताकदवान नेता दिसून येत नाही. जसे घटना तयार करण्याकरीता काँग्रेस पक्षाने त्याग करुन घटना तयार करण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे राज्य घटनेची सर्व सुत्रे दिली. त्याच प्रमाणे विविध पक्षाच्या एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्यांक नेत्यांनी आपापल्या पक्षाचा त्याग करुन घटनेचे संरक्षण आणि आपल्या सर्वांचे आरक्षण मिळवून घ्यायचे असेल तर एक आणि एकच नेता निवडावा लागेल. ज्यांना प्रश्नाची जाण आहे, ज्ञान आहे, ताकद आहे असा खंबीरनेता म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आद. ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व मान्य करावे लागेल तरच प्रश्न सुटतील आणि त्या करीता आपल्याकडेपुरेसा अवधी नाही. आपण पूर्वीचा इतिहास पाहिला, स्वातंत्र्यापूर्वी ५६७ संस्थाने होती ती संस्थाने खालसा करून राज्यघटनेच्या माध्यमातून अखंड भारत उभा केला आणि संविधानामार्फत देश चालवण्याचे स्वातंत्र्य नागरीकांना देण्यात आले.

# जैविक इंधन निर्मितीवर भर द्यावा -गडकरी

**पुणे । वृत्तसंस्था**

ग्रीन हायड्रोजन सारखे जैविक इंधन ही काळाची गरज बनली असून भविष्यात साखर कारखान्यांनी साखरेबरोबरच पर्यायी जैविक इंधन निर्मितीवर भर द्यावा, असे आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी केले. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित तिसऱ्या आंतरराष्ट्रीय साखर परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष व राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार या वेळी उपस्थित होते. इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष आदित्य झानुझुनवाला, राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, राज्य साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष पांडुरंग पाटील या वेळी उपस्थित होते. गडकरी म्हणाले, एका बाजूला कृषी उत्पादनांच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला असून अनेक कृषी उत्पादने मागणीपेक्षा जास्त आहेत त्यामुळे त्यांना पुरेसा भाव मिळत नाही. परिणामी शेतकऱ्यांना त्यासाठी स्वतंत्र अनुदान द्यावे लागते आणि दुसऱ्या बाजूला आपण सुमारे ८० टक्के पारंपरिक इंधन आयात करतो. आपल्या देशातील साखर उद्योग हा पूर्णपणे ब्राझीलसारख्या देशावर अवलंबून असल्याने भविष्याचा विचार करता केवळ साखर उत्पादनावर अवलंबून राहणे आपल्याला परवडणारे नाही. म्हणूनच साखर उद्योगाने आता साखरेऐवजी इथेनॉल आणि तत्सम जैविक इंधनासारख्या उत्पादनावर अधिक भर देण्याची गरज आहे. केवळ साखर उद्योगच नव्हे तर देशभरातील कृषी उत्पादनांच्या माध्यमातून ग्रीन हायड्रोजन सारखे इंधन तयार करण्यावर अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

पान १ वरून....

## मराठा आंदोलनाविरोधात

या उपोषणाची रुपरेषा त्यांनी गुरुवारी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथील एका रुग्णालयात पत्रकारांशी संवाद साधला जाहीर केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मराठा समाजाची पायी दिंडी २० जानेवारी रोजी सकाळी ९ वा. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघेल. त्यानंतर ती मजल दरमजल करत अहमदनगर - पुणेमार्गे मुंबईला पोहोचेल

## राष्ट्रमाता जिजाऊ

होते. स्थानिक नगर परिषदेच्या वतीने अध्यक्ष सतीश तायडे यांनी सपत्नीक महापूजा केली. मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, सर्वपक्षीय नगरसेवक या वेळी उपस्थित होते. दरम्यान, राजवाड्यात पालिकेच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. ऐतिहासिक वेशभूषा आणि मुलांच्या चेहऱ्यावर हास्य राजवाड्यात जसजसा सूर्य उदयास येऊ लागला तसतसे विविधरंगी पारंपरिक पेहरावातील महिला पुरुषांच्या वावराने राजवाडा परिसर विविध रंगांनी न्हाऊन गेला होता. ऐतिहासिक वेशभूषेतील शालेय विद्यार्थ्यांनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. कुणी छत्रपती साकारले तर कुणी जिजाऊ आईसाहेबांचा पेहराव केला. सावित्रीबाई, अहिल्याबाई, इतिहास काळातील महिलांचा पेहरावदेखील सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. जिल्हा परिषदसारख्या महत्त्वपूर्ण विभागाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या महिला आहेत. जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी महापूजा केली जाते. या वर्षी सीईओ भाग्यश्री विसपुते यांनी पारंपरिक वेशात जिजाऊ माँसाहेब यांना अभिवादन केले. या वेळी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, सिध्देश्वर काळुसे, गटविकास अधिकारी डॉ. श्रीकृष्ण वेनिकर, पंचायत समितीतील अन्य अधिकारी या वेळी उपस्थित होते.

## मावेजा न दिल्याने

आहेत. यशवंत घोळवे यांच्याकडून ॲड बाबुराव तिडके यांनी काम पाहिले. चार वाजल्यापासून प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वकील उपयोगी कार्यालयात पोहोचले होते. उपविभागीय अधिकारी यांनी यशवंत घोळवे यांना मावेजापोटी चेक न दिल्यास गाडी घेऊन जाण्यात येईल अशी माहिती ॲड तिडके यांनी दिली. याबाबत येथील उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता यांचा संपर्क होऊ शकला नाही.

## बीडमध्ये जाळपोळ

संतोष वाळके, पोलिस निरीक्षक बालक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक कैलास भारती, हवालदार बहिरवाळ, अविनाश सानप, हवालदार अभिमन्यू औताडे, एलसीबीचे उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, हवालदार मनोज वाघ, प्रसाद कदम, विकास वाघमारे, सोमनाथ गायकवाड, सचिन आंधळे, अशोक कदम आदींनी केली.

## भाजपाचे राजकारण

प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, सोशल मीडीयाचे प्रमुख विशाल मुत्तेमवार, प्रज्ञा वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना नाना पटोले पुढे म्हणाले की, अयोध्येत राम मंदिर व्हावे यासाठी आपणही यापूर्वी देगणी दिली, विटा दिल्या, राम मंदिरासाठी न्यास आहे पण भाजपा मात्र राम मंदिराचे राजकारण करत आहेत. अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम अर्धवट आहे ते पूर्ण होण्यास आणखी तीन वर्षे लागणार आहेत परंतु निवडणुकीच्या तोंडावर राजकीय फायदा उठवण्यासाठी अर्धवट बांधकाम असलेल्या मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई भाजपाला झाली आहे. हिंदू धर्माचे सर्वोच्च असलेल्या चारही शंकराचार्यांचा अशा पद्धतीच्या प्राणप्रतिष्ठेला विरोध आहे. अर्धवट बांधकामाच्या मंदिरात प्राण प्रतिष्ठा करणे चुकीचे आहे असे शंकराचार्य सांगत आहेत पण भाजपा त्यांचेही ऐकत नाही. भारतीय जनता पक्ष धर्म भ्रष्ट करत आहे आणि आरोप मात्र काँग्रेस पक्षावर करत आहे. राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले, झाशीची राणी यांचा काळ वेगळा होता व आताचा काळ वेगळा आहे. त्यावेळी अत्याचारी व्यवस्थेविरोधात लढा देताना पारतंत्र्य होते, अशा विपरीत परिस्थितीतही त्यांनी मोठ्या धैर्याने लढा दिला, त्यांचे विचार आजही प्रेरक आहेत, याच आपल्या प्रेरणास्रोत आहेत, त्यांचे विचार घेऊन पुढे जावा. आज आपण स्वातंत्र्यात आहोत आपल्याला मत मांडण्याचा अधिकार आहे. भाजपाच्या अत्याचारी व्यवस्थेविरोधात उभे राहिले पाहिजे, आवाज उठवला पाहिजे. नारीशक्ती मोठी शक्ती आहे, या शक्तीने भाजपाच्या अत्याचारी व्यवस्थेविरोधात आवाज उठवला पाहिजे. काँग्रेसच्या विविध विभाग व सेलच्या माध्यमातून ही नारीशक्ती गावागावात काँग्रेसचा विचार रुजवत आहेत हा प्रचार व प्रसार असाच कायम ठेवा व अत्याचारी व्यवस्था संपुष्टात आणून पुन्हा काँग्रेसचे सरकार आणा, असे आवाहन पटोले यांनी केले.

पान ४ वरून...

## धारूर महाविद्यालयात

आदर्श निर्माण केला तसेच स्वामी विवेकानंदांच्या सारखा ज्ञानी, तपस्वी, प्रज्ञावंत कसा असतो तसेच शिकागो धर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करून हिंदू धर्मातील मानवतेच्या मूल्यांची शिकवण जगाला देणारे स्वामी विवेकानंद ठरतात आहेत असे सांगितले. याप्रसंगी विज्ञान शाखेतील विद्यार्थिनी कुमारी निर्मला ओमप्रकाश पांचाळ यांनी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या आवाहनानुसार इयत्ता अकरावी विज्ञान शाखेची पुस्तके महाविद्यालयातील ग्रंथालय विभागास दान केली. या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाकरिता उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे यांची उपस्थिती होती. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी ठीक ११: ०० वाजता महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय युवा महोत्सव (छधत्र) उद्घाटन समारंभाचे लाईव्ह स्ट्रीमिंगचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमिनार हॉल मध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. आर. भोसले सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. डी. बी. जाधव यांनी केले तर आभार डॉ. व्ही. एस. कुंभारे यांनी मानले. या प्रसंगी मोठया संख्येने स्वयंसेवक, विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## उर्वरित वसतिगृहे सुरू

अहमदनगर व जालना जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात २० वसतिगृहे भाड्याच्या जागेत सुरू देखील करण्यात आली होती. यांपैकी आतापर्यंत ५ वसतीगृहांना स्वतःच्या जागेत इमारत बांधकामासाठी प्रत्येकी १० कोटी रुपये निधी देखील शासनाने उपलब्ध करून दिला आहे. त्यानंतर उर्वरित ६२ वसतिगृहे सुरू करण्यात यावेत, याबाबत धनंजय मुंडे यांनी सध्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली होती. त्यानुसार आता आणखी ३१ तालुक्यात ६२ वसतिगृहे उभारण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. ही वसतिगृहे सुरुवातीस भाड्याच्या जागेत चालवली जाणार असून आगामी शैक्षणिक वर्षांपासून खुली करण्यात येतील, तसेच टप्प्याटप्प्याने वसतिगृहे स्वतःच्या जागेत इमारती उभारून चालवली जातील. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये यादृष्टीने ऊसतोड कामगारांच्या मुलांची शाळेसह निवास व भोजनाची उत्तम सोय व्हावी, या दृष्टीने ही वसतिगृहे अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. ऊसतोड कामगारांच्या पुढील पिढ्यांच्या हातात कोयता येऊ नये, या दृष्टीने शासनाचे हे अत्यंत मोठे पाऊल आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब व स्व.पंडित अण्णा मुंडे यांचे हे एक स्वप्न होते, आज हे स्वप्न महायुती सरकारच्या माध्यमातून आम्ही पूर्ण करू शकलो, याचा मला अभिमान आहे, तसेच याबद्दल मी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे हृदयपूर्वक आभार व्यक्त करतो, अशी भावुक प्रतिक्रिया कृषिमंत्री धनंजय मुंडेंनी व्यक्त केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# नागपूर ग्रामीण पोलिसांनी पकडला ५० लाखांचा गांजा;आरोपींना अटक

**नागपूर । वृत्तसंस्था**

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करीत नागपूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने ५० लाख रूपयांचा गांजा जप्त केला. या कारवाईने खळबळ माजली आहे. बुटीबोरी वाय पॉईंट येथे मिळालेल्या गुप्त बातमीवरून एक टाटा कंटेनरची झडती घेतली असता कंटेनरला आत वेगळा कप्पा करून त्यामध्ये प्लास्टिकच्या पोत्यांमध्ये लपवून आणलेला ऐकून ४ क्विंटल ९५ किलो ६००० ग्रॅम गांजा जप्त केला. त्याची किंमत ४९ लाख ५६ हजार रूपये इतकी आहे. यावेळी दोन आरोपींना अटक केली. त्यांच्या जवळील २ मोबाईल, टाटा कंटेनर गाडीही जप्त करण्यात आली आहे. माल विशाखापट्टणम येथून आणलेला होता व बिहार येथे जात होता. यापूर्वी नोव्हेंबर २०२३ मध्ये महसूल गुप्तचर संचालनालयाने १ कोटी ४ लाख रुपयांचा ५२० किलो गांजा जप्त केला होता. गांजा तस्करावरील ही मोठी कारवाई होती. मिळालेल्या गुप्त माहितीवरून नागपूर डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी नागपूरजवळील बोरखेडी टोल नाका येथे एक ट्रक रोखला. आंध्रमधील भद्राचलमजवळील जंगलातून हा गांजा राजस्थानमधील जयपूर येथे नेण्यात येत होता. १६ सप्टेंबर २०२३ रोजी मौदा टोलनाक्यावर ४२ लाख रुपयांचा २११ किलो गांजा पकडला होता. एका ट्रॅक्टरमधून ही वाहतूक होत होती. माहितीनुसार, ट्रकची बारकाईने तपासणी केल्यावर ड्रायव्हरची केबिन आणि ट्रकच्या मालवाहू भागामध्ये पोकळी तयार केली होती. या पोकळीत ५२० किलो गांजा आढळून आला. २४२ पॅकेजेसमध्ये गांजा पॅक केला होता. २०२३ मध्ये पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मादक पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करीत १ कोटी ५ लाखांचा गांजा पकडला होता.

# पिक कर्जमाफीसाठी रस्ता रोको आंदोलन

**परभणी । वृत्तसंस्था**

राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्जमाफी द्यावी तसेच पीक विम्याची रक्कम द्यावी यासह इतर मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी हिंगोली ते वाशिम मार्गावर कनेरगाव नाका येथे गुरुवारी ता. ११ तब्बल तीन तास रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे मराठवाडा व विदर्भातील वाहतूक ठप्प झाली होती. राज्यातील शेतकरी खरीप व रब्बी हंगामात अस्मानी संकटामुळे अडचणीत सापडला आहे. खरीप हंगामात लागवडीचा खर्चही निघाला नसल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. रब्बी हंगामाच्या चांगल्या उत्पादनाच्या अशा शेतकऱ्यांना होत्या. मात्र ढगाळ वातावरण, अवकाळी पाऊस, तसेच धुके यामुळे शेतकऱ्यांच्या उरल्या सुरल्या अशा संपुष्टात आल्या. आता शेतकऱ्यांना उदरनिर्वाहाचा प्रश्न भेडसावू लागला आहे. याशिवाय पीक कर्ज कसे फेडावे असा प्रश्नही शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे सेनगाव तालुक्यातील गोरेगाव येथील शेतकऱ्यांनी अवयव विक्री काढले होते. त्यानंतर काही दिवसांपूर्वीच गोरेगाव अप्पर तालुका विक्री काढला. त्यानंतर ही शासनाने शेतकऱ्यांच्या या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. आखाडा बाळापूर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेतकऱ्यांच्या बाबतीमध्ये मोठी घोषणा करतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. पिक विम्याची घोषणा होईल असा अंदाजही शेतकऱ्यांनी व्यक्त केला होता. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिक विमा बाबत कुठलीही घोषणा केली नाही त्यामुळे शेतकऱ्यांचा हिरमोड झाला. या प्रकारामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आज हिंगोली ते वाशीम मार्गावर कनेरगाव नाका येथे रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी गजानन कावरखे नामदेव पतंगे, दशरथ मुळे, बळीराम सावंत, गजानन जाधव, प्रवीण मते, राजेश मते, संजय मुळे, बालाजी शिंदे, संतोष वैद्य, संदीप कालवे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. सकाळी ११ वाजता सुरू झालेले आंदोलन दुपारी एक वाजता मागे घेण्यात आले. तबल तीन तास या आंदोलनामुळे हिंगोली ते वाशिम मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. यावेळी अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने चूक बंदोबस्त ठेवला होता

# बीडमध्ये उद्योजक होण्यासाठी मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन उन्नती प्रशिक्षण संस्था अर्थात अमृत पुणेचे प्रकल्प संचालक तथा ध्रुव आयएएस अकादमीचे प्रमुख विनोद देशपांडे आणि महाराष्ट्र संशोधन उन्नती प्रशिक्षण संस्थेच्या निबंधक डॉ. प्रियाताई देशपांडे यांनी बुधवारी (दि.१०) बीड येथे येऊन खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांशी चर्चा करत त्यांना अमृत विषयी सविस्तर माहिती दिली. या माध्यमातून राबवले जात असलेले उपक्रम आणि त्याचा खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांना कशाप्रकारे लाभ घ्यावा त्यासाठी लाभार्थ्यांनी कोणती कागदपत्रे पूर्ण करून आपला स्वतंत्र अर्ज दाखल करावा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित लाभार्थ्यांच्या मनात असलेल्या शंका आणि त्याची उत्तरेही त्यांनी दिली. महाराष्ट्र संशोधन उन्नती प्रशिक्षण संस्था अमृत या संस्थेद्वारे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी अमृत महामंडळ काम करत असून स्वयंरोजगारासाठी या घटकाला प्रोत्साहन प्रशिक्षण व लघु उद्योजक निर्मिती अशी राज्य शासनाची योजना असल्याचे यावेळी दोन्ही मान्यवरांनी सांगितले. लघुउद्योजक होण्यासाठी अमृतच्या माध्यमातून स्वतःचा पहिला नवा व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणत्याही वयाची अट नाही तसेच आर्थिक दुर्बल घटकातील महिला भगिनीही या योजनेचा लाभ घेऊ शकतात हे यावेळी डॉ. प्रियाताई देशपांडे यांनी विस्ताराने मार्गदर्शन करत सांगितले. तसेच यावेळी डॉ. प्रिया देशपांडे यांनी कृषी आणि शैक्षणिक योजना संबंधी विस्ताराने माहिती दिली. लघुउद्योजक होण्यासाठीच्या कोणत्याही टप्प्यावर काही अडचणी आल्या अथवा मार्गदर्शन हवे असल्यास त्याबाबत अमृतची स्वतंत्र वेबसाईट अर्थात संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून त्यावर वेळोवेळी अपडेट माहिती उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# हिट अँड रन कायद्याच्या निषेधार्थ ट्रक चालकांचा बंद सुरू

**नगर । वृत्तसंस्था**

हिट अँड रन कायद्याच्या निषेधार्थ ट्रक चालकांचा बंद सुरू असताना ट्रक चालवणाऱ्यांना अडवून त्यांच्या गळ्यात चपलांचा हार घालण्यासह त्यांच्या गाड्यांच्या काचांना काळे फासणे व गाड्यांच्या टायरमधील हवा सोडून देत वाहन चालकांनी उग्र आंदोलन केले. गुरुवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील कोठला बसथांबा जवळील इदगाह मैदानाबाहेर रस्त्यावर हे आंदोलन करण्यात आले. यावेळी गर्दी झाल्याने पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. या महामार्गावरील वाहतूकही ठप्प झाली होती. दरम्यान, या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी १२ जणांना ताब्यात घेतले व समज देऊन सोडले. केंद्र सरकारने हिट अँड रन कायद्यात केलेल्या नव्या तरतुदींच्या निषेधार्थ अहमदनगर ड्रायव्हर युनियन संघटनेचे कोठला बसथांब्याजवळ आंदोलन सुरू होते. यावेळी तेथून काही परराज्यातील व काही महाराष्ट्रातील ट्रक चालल्या होत्या. आंदोलनात सहभागी न होता ट्रक चालवल्याच्या रागात आंदोलकांनी त्या अडवून चालकांना चपलांचा हार घातला. काहींनी त्यांच्या गाड्यांना काळे फासले व त्या गाड्यांच्या चाकातील हवाही सोडून दिली. अचानक सुरू झालेल्या या प्रकाराने चौकात गर्दी झाली होती. दोन्ही बाजूंची वाहनेही थांबून वाहतूक ठप्प झाली होती. या घटनेची माहिती समजल्यावर तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व सौम्य लाठीमार करीत गर्दी पांगवली व वाहतूक सुरळीत केली. घटनेनंतर पोलिसांनी १२ जणांना ताब्यात घेऊन भिंगार कॅम्प पोलिसांच्या सुपूर्द केले.

# मराठा आरक्षणाबाबत उदयनराजेंचा शिंदे-भाजप सरकार विरोधात संताप

**मुंबई । वृत्तसंस्था**

जास्त दिवस घोंगड भिजत ठेवलं तर ते वास मारतच आणि जास्त दिवस एखद्याकडे दुर्लक्ष केलं तर चीड येणारच असं म्हणत भाजपचे राज्यसभेचे खासदार उदयनराजे भोसले यांनी सरकारला घरचा आहेर दिला. सध्या राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पटलावर आहे. त्यातच आता त्या आरक्षणाची मागणी मुंबईत केली जाणार असून मनोज जरांगे पाटील हे पायी दिंडीने मुंबईच्या दिशेने कूच करतील. पण त्याआधी उदयनराजे भोसले यांनी या मुद्द्यावर भाष्य केलं आहे. यावेळी




बोलताना त्यांनी शरद पवारांना देखील टोला लगावला. त्यावेळेस जर मंडल आयोगाच्या बाबतीत सगळं केलं असतं तर आज हा विषयच राहिल नसता, असं म्हणत उदयनराजेंनी शरद पवारांवर टीका केली. इतर राज्यांप्रमाणे राज्यातील आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी देखील यावेळी उदयनराजेंनी केलीये. राज्यातील आरक्षण मर्यादा वाढवली तर सहज प्रश्न सुटेल. आरक्षण मर्यादा ७० ते ७२ टक्के करा, हाच पर्याय असल्याचं उदयनराजे यांनी म्हटलं. इतर राज्यांनी जसे राज्य पातळीवर जसे निर्णय घेतले तसे महाराष्ट्र शासन निर्णय घेतला तर सहज आरक्षण विषय सुटेल, लोक आज ग्रासले आहेत, असं उदयनराजेंनी म्हटलं मागील अनेक महिन्यांपासून राज्यात मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनाने सुरुवात केलीये. त्यातच आता मनोज जरांगे यांनी २० जानेवारी रोजी मुंबईकडे कूच करणार असल्याची घोषणा केलीये. त्यामुळे आता मराठा आरक्षणासाठीचे आंदोलन हे मुंबईत सुरु होणार आहे. त्याचप्रमाणे ओबीसीतूनच मराठा आरक्षण हवे अशी मागणी मराठा समाजाकडून केली जातेय. तर मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण घेऊ देणार नाही, अशी भूमिका राज्यातील ओबीसी नेत्यांनी घेतलीये. त्यामुळे राज्यात सध्या ओबीसी विरुद्ध मराठा समाज असा संघर्ष पाहायला मिळतोय.

# जालन्याच्या लेकीला साडेतीन कोटींचे पॅकेज:शीतल जुंबडचा थक्क करणारा प्रवास

**जालना । वृत्तसंस्था**

मास्टर पदवी घेण्यासाठी गेलेल्या तरुणीने जीआरई तसेच टोफेल अशा दोन्ही परीक्षा पात्र करून अमेरीकेच्या स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ युटाहमध्ये प्रवेश मिळवला. या उच्च पदवीच्या द्वितीय वर्षात असतानाच तिची इन्विडीया या कंपनीत सीनियर सिस्टिम सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून निवड झाली. तिला यासाठी तब्बल ३ कोटी ६० लाखांचे पॅकेज मिळाले आहे. जालना ते थेट अमेरिका असा प्रवास करणारी शिक्षकाची मुलगी शीतल जुंबड मुलींसाठी रोल मॉडेल ठरली आहे.

जि. प. शाळेतील शिक्षक बाबासाहेब जुंबड यांची कन्या शीतल हिने कुटुंबीयच नव्हे तर जिल्ह्यात नोकरदारांच्या वेतनाचा रेकॉर्डच ब्रेक केला आहे. शीतलने इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण बालविकास प्राथमिक शाळा जालना, पाचवी सरस्वती भुवन हायस्कूल, तर इयत्ता ६ वी ते १० वीचे शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय परतूर, ११ वी १२ वी विश्वशांती ज्युनियर महाविद्यालय इंदेवाडी येथे पूर्ण केले. त्यानंतर बीटेक व्हीआयटी इंजिनिअरिंग कॉलेज पुणे येथून पूर्ण केले. त्यानंतर अमेरिकन विद्यापीठात मास्टर पदवीसाठी लागणाऱ्या जीआरई, टोफेल या दोन्ही परीक्षा पात्र केल्या. तिने असिस्टंट प्रोफेसर म्हणुन जॉब करत मास्टर्स अमेरिकेत केले. यादरम्यानच पीजी कॉम्प्युटर करत होती. कॅलिफोर्निया येथे सीनियर सिस्टिम सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून ८ रोजी जॉइन झाली.

वडील शिक्षक आणि आई गृहिणी अशा या जुंबड कुटुंबातील तिन्ही मुले सुशिक्षित आहेत. मुलगा व्हीआयटी पुणे येथे इंजिनिअरिंग करतो. बीटेक प्रथम वर्षात आहे. एक मुलगी एमबीबीएस द्वितीय वर्षात आहे. सर्वात मोठ्या शीतलने नुकतेच अमेरिकन विद्यापीठातील सर्वोच्च मल्टिनॅशनल कंपनीत स्थान मिळवले. मुलीचा अभिमान असल्याचे बाबासाहेब जुंबड यांनी सांगितले.

# केंद्र सरकारचा अखेरचा अर्थसंकल्प

**दिल्ली । वृत्तसंस्था**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३१ जानेवारीपासून सुरू होत असून ते ९ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. सूत्रांनी ही माहिती दिली आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३१ फेब्रुवारीला राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने सुरू होईल आणि त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला जाईल. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सर्कारकरचा हा दुसऱ्या कार्यकाळातील अखेरचा अर्थसंकल्प ठरणार आहे. ३१ जानेवारीपासून होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारीला २०२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर करणार आहेत. ३१ जानेवारी रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रारंभी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करतील. यानंतर आर्थिक पाहणी अहवाल ३१ जानेवारीलाच सादर केला जाणार आहे. अरर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी पीएम किसान सन्मान निधी दुप्पट करण्याचा प्रस्ताव असू शकतो. एवढेच नाही तर महिलांबाबत काही मोठ्या घोषणाही केल्या जाऊ शकतात अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकांपूर्वी मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्मचा हा अखेरचा अर्थसंकल्प असल्याने या अर्थसंकल्पात मतदारांना आकर्षित करण्यासाठी घोषणांचा पाऊस पडतो का याकडे लक्ष असेल. नुकत्याच झालेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळाला. संसदेची सुरक्षा व्यवस्था भेदून झालेला हल्ला, लोकसभा व राज्यसभेतील विरोधी पक्षातील खासदारांचे घाऊक निलंबन यांमुळे हिवाळी अधिवेशन तापले. अशातच अर्थसंकल्पीय अधिवेशनात काय होत हे पाहावं लागणार आहे.

# क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ; विदर्भातील खेळाडूंसाठी मोठी पर्वणी -नितीन गडकरी

**नागपूर । वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारण्यात येत असलेल्या खासदार क्रीडा महोत्सवाला शुक्रवार १२ जानेवारी पासून सुरुवात होत आहे. यंदाच्या या खासदार क्रीडा महोत्सवाचे हे सहावे पर्व आहे. केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन होणार. यंदाच्या या खासदार क्रीडा महोत्सवामध्ये ६० खेळांचा समावेश करण्यात आला असून, ६६ मैदानांवर ही स्पर्धा रंगणार आहे. ज्यामध्ये सायकलिंग, खो-खो, एथलेटीक्स, कबड्डी, बॅडमिंटन आणि ज्युडो हे सहा खेळ विदर्भ स्तरावर आयोजित करण्यात आले आहेत. विशेष बाब म्हणजे या क्रीडा महोत्सवात एकूण १.३५ कोटी रुपयांची पारितोषिके वितरीत करण्यात येणार आहे. १२ जानेवारी ते २८ जानेवारी असे १७ दिवस नागपूरात या क्रीडाकुंभाचे



आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक खेळाडूंच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यातील कौशल्य सर्वांपुढे यावे, यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात यंदा सुमारे ६५ हजार खेळाडू सहभागी होण्याची शक्यता आहे. ज्यामध्ये ६० विविध खेळांचा समावेश करण्यात आला असून, हे सर्व खेळ नागपूरच्या ६६ मैदानांवर खेळले जाणार आहे. ज्यामध्ये १२, ५०० सामने आणि १०५० संघ सहभागी होणार आहे. १२ जानेवारी ते २८ जानेवारी असे १७ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ७३५ पारितोषिक आणि ८,९८० पदकांचा समावेश करण्यात आला आहे. मध्य भारतातील हा सर्वात मोठा क्रीडा महोत्सव असल्याचा दावा आयोजकांनी केला असून जास्तीत जास्त खेळाडूंनी या मध्ये सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात

# राष्ट्रमाता जिजाऊ जयंती दिनी जन्मलेल्या मुलींचे डॉ.ज्योती मेटे यांच्याकडून स्वागत, मातांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते विनायकराव मेटे यांनी मुलींचा जन्म दर वाढावा यासाठी सुरू केलेली चळवळ पुढे सुरू ठेवत आज शिवसंग्रामच्या वतीने जिल्हा रुग्णालयात जिजाऊ जयंती निमित्त जन्मलेल्या मुलींचे स्वागत करून त्यांच्या मातांचा सन्मान करण्यात आला यावेळी मुलींना कपडे आणि त्यांच्या मातांना साडी चोळी देण्यात आली या प्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागेश चव्हाण, शिवसंग्राम जिल्हा अध्यक्ष नारायण काशीद, अनिल घुमरे पाटील, सुहास पाटील,मनोज जाधव, गणेश मोरे, शेषेराव तांबे,पंडित शेंडगे,महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष मनीषा कुपकर, मा. पंचायत समिती सभापती



कोकाटे, साक्षी हांगे , दातखीळ, संगीता ठोसर, तांबे , लांगोरे, गायकवाड, अंजली पटाईत उपस्थित होत्या. मुलींचा जन्म दर वाढावा यासाठी स्व. विनायकराव मेटे यांनी विविध कार्यक्रम, योजना आयोजित केल्या होत्या यात शिरूर कासार तालुक्यात अजित बालिका योजना, आणि या योजने अंतर्गत मुलींच्या नावे फिक्स डिपॉझिट ठेवी ठेवणे आणि जिजाऊ जयंती जन्मलेल्या मुलींचे अनोख्या पद्धतीने स्वागत करून त्यांचा माताचा सन्मान करण्याचे कार्य त्यांनी केले होते. त्यांची ही चळवळ पुढे चालू ठेवत आज जिल्हा रुग्णालयात डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनी मुलींचे स्वागत करून त्यांच्या मातांचा सन्मान केला.



बीड : ज्या मातेमुळे हिंदवी स्वराज्याचं देखणं स्वप्न निर्माण झालं, त्या राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या जयंती निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिजाऊ माँसाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले समवेत अँड.पोकळे , जिल्हा संघटक संगीता चव्हाण सर्व पदाधिकारी व शिवसैनिक व शिवरायांचे मावळे उपस्थित होते.

## उर्वरित वसतिगृहे सुरू करण्यास शासनाची मान्यता -मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

कृषिमंत्री मुंडे हे जनक असलेल्या एका योजनेची पूर्तता खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे! सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांतर्गत सुरू करण्यात आलेल्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह



योजनेतून ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी चालविण्यात येणारी उर्वरित ६२ वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून, याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आलाय. ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची अधिकृत स्थापना करून योजना कार्यान्वित केल्याने संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेचे जनक मुंडे यांना मानले जाते. या योजनेंतर्गत राज्यात ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या ४१ तालुक्यांची निवड करून त्यात १०० क्षमतेचे मुला-मुलींसाठी स्वतंत्र असे एकूण ८२ वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना घेतला होता. तसेच त्यांच्या कार्यकाळात बीड,

▶▶ पान २ वर




बीड : सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, नवी मुंबई महाराष्ट्र येथील कक्ष अधिकारी तथा महाराष्ट्र संशोधन उन्नती प्रशिक्षण संस्थेच्या निबंधक डॉ. प्रियाताई देशपांडे यांनी आज गुरूवारी (दि.११) बीड येथे जगदंबा प्रतिष्ठानच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी डॉ. प्रियाताई देशपांडे यांचा प्रतिष्ठानचे संचालक लहुरीकर यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी पत्रकार सुशील देशमुख, अविनाश वाघीरकर, ज्येष्ठ पत्रकार कुलकर्णी, जोशी, प्रकाश कानगावकर इत्यादी.


## पिंपळनेर येथे राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री व्यंकटेश इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संयुक्त जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेश नागरगोजे तर प्रमुख पाहुण्या म्हणून सुरेखा यादव यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश नागरगोजे व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी चिमुकल्यांनी



राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषा परिधान करून पालक व प्रमुख पाहुण्यांचे लक्ष वेधले. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर श्रद्धा नागेश तर स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याची माहिती टिटू नायक यांनी दिली. यानंतर जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेत आलेल्या चिमुकल्यांचे मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी सावंत तर आभार माधुरी पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड : राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्या निमित्त सिंदखेड राजा येथे जाऊन अभिवादन केले आणि मराठा सेवा संघाचे सर्वेसर्वा श्री पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांची भेट घेतली व राजमाता जिजाऊ जन्मोत्सव विशेष वृत्तपत्राचे अंकाचे प्रकाशन केले रामहरी मेटे व मा आ रेखाताई खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उपस्थित नारायण टकले राजेश इंगळे सचिन खरात विजय डोके दत्ता अंभोरे महादेव खेडकर आदी उपस्थित होते

## पहिला हप्ता जमा -चेअरमन विरेंद्र सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन. २०२३-२४ चा ऊस गळीत हंगाम सुरु असुन दिनांक ११/१२/२०२३ ते १७/१२/२०२३ या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचा पहिला हप्ता प्रति मे.टन रुपये २७००/- प्रमाणे ऊस उत्पादक शेतकरी यांचे बँक खाती जमा केला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांनी दिली. या चालु गळीत हंगामामध्ये माआ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब, उपाध्यक्ष साखर संघ मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली



कारखान्याचे ऊस गाळप सुरु असुन दिनांक ११/१/२०२४ अखेर ६७ गाळप दिवसामध्ये ३४०२०० मे.टन ऊसाचे गाळप करुन ९.७२ टक्के सरासरी साखर उता-याने १९११५० विंवटल शुभ साखरेचे उत्पादन घेण्यात आलेले आहे. चालू हंगामात कारखान्याकडील इथेनॉल व को.जन प्रकल्प कार्यान्वीत असुन आजअखेर सिरप इथेनॉल ६६४७५७६ लिटर आणि बी. हेवी इथेनॉल १२४२५७४ लिटरचे उत्पादन झाले असुन १५३२१६०० युनीट विज महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस वितरीत केलेली आहे. दिनांक १०/१२/२०२३ पर्यंत गाळप झालेल्या ऊसाचा पहिला हप्ता रुपये २७००/- प्रमाणे होणारी रक्कम यापूर्वीच ऊस उत्पादकांचे बँक खाती वर्ग करण्यात आलेली होती. पुढील कालावधीत म्हणजेच दिनांक ११/१२/२०२३ ते १७/१२/२०२३ या कालावधीत ३७७०३.७७५ मे.टन गाळप झालेल्या ऊसाचा पहिला हप्ता प्रती मे.टन रु.२७००/- प्रमाणे होणारी एकुण रक्कम रुपये १०.१८ कोटी ही दिनांक ११/१/२०२४ रोजी संबंधीत ऊस उत्पादकांचे बँक खाती वर्ग केलेली आहे. तरी वरील कालावधीत ज्या ऊस उत्पादकांचा ऊस गाळपास आलेला आहे त्यांनी आपल्या नजिकच्या बँकेशी संपर्क साधुन आपल्या ऊस बिलाची रक्कम घेवुन जावी असे आवाहन कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांनी केले आहे.




माजलगाव : राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रसंगी प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड समवेत कारखाना कर्मचारी साबळे,मुंजाबा निर्मळ, मोटेगावकर, नागोराव निर्मळ, बडे, महादेव मुरकुटे, ज्ञानेश्वर ठोंबरे, नाना वाघचौरे, विठ्ठल पोळ,सावंत,विर इत्यादी.

## धारूर महाविद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ जयंती निमित्त व्याख्यान संपन्न -जयदीप सोळुंके

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागारच्या वतीने १२ जानेवारी २०२४ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्ताने प्रतिमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, प्रमुख वक्ते डॉ. जयदीप सोळुंके यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. जयदीप सोळुंके यांनी राजमाता जिजाऊ या छत्रपती शिवरायांना घडविणाऱ्या आदर्श माता कशा होत्या हे सविस्तर सांगून त्यांच्या व्यक्तित्वाचे विविध पैलू वर सविस्तर प्रकाश टाकला. राजमाता जिजाऊंच्या पराक्रमी व्यक्तिमत्त्वाची विविध उदाहरणांच्या माध्यमातून ओळख पटवून दिली. स्वामी विवेकानंद हे अथांग महासागरासारखे बुद्धीचा सागर असलेले व्यक्तिमत्व होते. जगाला बंधू भावाचे मूल्य सांगणारे प्रज्ञावंत आहेत. अलौकिक बुद्धिमत्ता लाभलेले स्वामी विवेकानंद बुद्धीचा सागर होते असे उपस्थितांना सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी अध्यक्षीय समारोपात राजमाता जिजाऊ माँ साहेब या आजच्या काळातही सबंध महिला जीवनासमोर एक आदर्श व्यक्तिमत्व व्यक्तिमत्व आहे. जगातील स्त्रियांना आदर्श मातेचे कर्तृत्व कसे असावे हे दाखवून दिले व जगासमोर नवा

▶▶ पान २ वर



सिरसाळा : राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती सिरसाळ्यात शाळा ,महाविद्यालये, सह अनेक ठिकाणी साजरी झाली, जयंती निमित्त हिंदवी गरड ह्या चिमुकल्या विद्यार्थीनीने जिजाऊंची वेशभूषा प्रधान केली होती. शाळेत हिंदवीचे शिक्षक ,विद्यार्थ्यांनी कौतुक केले.

## राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन

बीड : राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब जयंती निमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने दि.१२ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता जिजाऊंना अभिवादन करण्यात आले. देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष यांनी जिजाऊंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड, तुलसी आर्ट, सायन्स अँड कॉमर्स जूनियर कॉलेज बीड,तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड, तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथील सर्व प्राध्यापक शिक्षक विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.




## ओबीसी सभेला भुजबळांना मराठा आंदोलकांचा विरोध

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये शनिवार १३ जानेवारी रोजी ओबीसी महाएल्गार सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. या सभेला ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ उपस्थित राहतील. पण बीडमधील या महाएल्गार सभेला मराठा आंदोलकांनी विरोध दर्शवला आहे. तसेच भुजबळांना जर बीडच्या सभेला यायचं असेल तर त्यांनी राजीनामा देऊन यावं, अशी मागणी देखील करण्यात आली आहे. ओबीसीतूनच मराठा आरक्षणाच्या हवं या भूमिकेवर मनोज जरांगे ठाम आहेत, तर ओबीसीतून मराठा आरक्षण देऊ देणार नाही, अशी भूमिका ओबीसी नेत्यांनी घेतलीये. त्याच पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यभरात ओबीसी महाएल्गार सभेचं आयोजन करण्यात येत आहे. ओबीसी मेळाव्यास विरोध नाही मात्र छगन भुजबळ यांनी संविधानिक पदावरती घेतलेल्या गोपनीयतेच्या शपथेचा भंग करत असल्याचं या आंदोलकांचं म्हणणं आहे. तसेच मराठ समजाच्या विरोधात त्यांची भूमिका असून त्यामुळे मराठा आणि




ओबीसी समाजामध्ये तेढ निर्माण केला जातोय, अशी प्रतिक्रिया मराठा आंदोलकांनी दिली. त्यामुळे जर बीडच्या सभेला यायचं असेल तर त्यांनी आपला राजीनामा द्यावा अन्यथा लोकशाहीच्या मार्गाने त्यांच्या सभेला मराठा आंदोलन विरोध करणार असल्याचं यावेळी मराठा आंदोलकांनी म्हटलं आहे. एकीकडे मराठा आंदोलकांकडून भुजबळांच्या सभेला विरोध होत आहे. तसेच दुसरीकडे प्रशासनाने देखील या आंदोलकांना परवानगी नाकारावी, अशी मागणी देखील या आंदोलकांनी केली आहे. त्यामुळे उद्या बीडमध्ये होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्याला मराठा आंदोलक विरोध करत असून आता या सभेचं स्वरुप कसं असणार हे पाहणं जास्त महत्त्वाचं ठरणार आहे. त्याचप्रमाणे छगन भुजबळ या सभेत काय बोलणार याकडे देखील सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. २० जानेवारी रोजी मनोज जरांगे हे मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत. दरम्यान आता मराठा आंदोलनाची हाक मुंबईतून दिली जाईल. पण या आंदोलनास परवानगी देऊ नये, अशी मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या मुंबईतील या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते हेमंत पाटील यांच्याकडून उच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

## पाटोदा तालुक्यातील ११ शाखेच्या उद्घाटनाची झंझावात



**पाटोदा । प्रतिनिधि**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे सर, माजी मंत्री तथा सहसंपर्कप्रमुख बदामराव आबा पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आज पाटोदा तालुक्यातील सोनेगाव ,रस्ता गल्ली , लहुळ वस्ती येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ३ शाखाचे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात उद्घाटन सोहळे संपन्न झाले. यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले पक्षाच्या अडचणीच्या काळात जनता उद्धव ठाकरे साहेबांसोबत उभी आहे. पक्षाच्या कठीण काळात जे शिवसैनिक शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाला साथ देतील याची दखल शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे नक्कीच घेतील असा विश्वास शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी व्यक्त केला. शाखा क्र.१.सोनेगाव येथील शाखा प्रमुख श्री निवास गौरे , उपशाखा प्रमुख किरण चौरे, सचिव इत्यादी.